**Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies,**
*Online ISSN 2278-8808, SJIF 2019 = 6.380, www.srjis.com*
*PEER REVIEWED & REFEREED JOURNAL, MAR-APR, 2020, VOL- 7/58*

# सृजनशील उपक्रमातून विद्यार्थ्यांमधील श्रमप्रतिष्ठा मूल्याचा विकास

**प्रा. मुन वैशाली दिनेश**
*संशोधिका*
**डॉ. मोहन कांबळे**
*मार्गदर्शक , आदर्श बहुव्यापी शिक्षण व संशोधन महाविद्यालय एरंडवणा,*
*पुणे – ४*

**Abstract**

प्रस्तुत संशोधनामध्ये ग्रामीण भागातील बी.एड. प्रशिक्षण घेणारे २० प्रशिक्षणार्थ्यांना संशोधिकीने श्रमप्रतिष्ठा या मूल्याविषयी स्व:निर्मित केलेली प्रश्नावली सोडविण्यास दिली. त्यानंतर पाच दिवसांचा उपक्रम राबविला परत तीच प्रश्नावली सोडविण्यास दिली. दोन्ही चाचणीचे मध्यमान, प्रमाणविचलन, टी परिक्षिका या साधनाद्वारे परिणामकारकतेचा अभ्यास केला.

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

**प्रस्तावना**

आजच्या परिवर्तनशील जगामध्ये परिवर्तनाचा वेग लक्षात घेता पुढील शतकात हा वेग किती वाढेल याची कल्पना करू शकतो. म्हणून सतत नवनवीन परिस्थितीतील आव्हानांना सामर्थ्याने तोंड देवून नव्या समस्या सोडविण्याची गतिमान व लवचिक मानसिक क्षमता विकसित केल्याशिवाय शिक्षणाला मूल्य राहणार नाही आणि एकूणच शिक्षण प्रक्रिया ही व्यक्तीला व समाजाला सामर्थ्यदायी ठरणार नाही यासाठी नव्या सहस्त्रकातील शिक्षक प्रशिक्षणात सृजनशील विचार प्रक्रिया याविषयी शिक्षकांना मार्गदर्शन होणे गरजेचे आहे.

**संकल्पना**

**सृजनशीलता** – जे.पी. गिलफोर्डने सृजनशीलता ही एक विशिष्ठ प्रकारची मानसिक क्षमता असून सृजनशील विचार हा बौध्दिक विचार असतो.

**मुल्य–** NCERT परंपरेला धरून एखाद्याच्या शारीरिक व मानसिक तसेच समाज हिताला आणि समायोजनाला उपयुक्त ठरणारी मार्गदर्शक जीवनतत्त्व म्हणजे मूल्य.

*Copyright © 2020, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

**सृजनशील मूल्यशिक्षणाची आवश्यकता—**

मूल्याधिष्ठित शिक्षण यशस्वीरितीने देण्यासाठी मूलयांचे अध्यापन करण्याचे कार्य शिक्षकांनाच करावयाचे आहे म्हणून त्यांच्या भूमिकेस महत्त्व आहे. ज्याप्रमाणे एखाद्या विषयाचे अध्यापन केले जाते(उदा. मराठी, हिंदी)त्याप्रमाणे मूल्यशिक्षणाचे अध्यापन करावे अशी कल्पना नाही. आपल्या अभ्यासक्रमातील प्रत्येक विषयातून मूल्यशिक्षण दिले जावे अशी अपेक्षा आहे. तसेच मानवी मूल्य रूजविण्यासाठी सृजनशील उपक्रम कार्यान्वित करावेत.

**मूल्य शिक्षणाची गरज —**

१. माहिती व तंत्रज्ञान

२. विविध प्रसारमाध्यमे

३. व्यसनाधिनता

४. परदेश आकर्षण

५. बदलते आदर्श

६. अंधश्रध्दा

मूल्यशिक्षण हे व्यक्तीवर सुसंस्कार करण्याचे साधन आहे. पण साधनांचा उपयोग साधण्याकरिता करावयाचा असतो. म्हणून शासनाच्या नवीन धोरणानुसार शालेय स्तरावर मूल्यशिक्षण हा विषय अनिवार्य केला आहे.

**२१व्या शतकातील लोप पावणारी मूल्ये —**

२१व्या शतकामध्ये शहरी भागातील व ग्रामीण भागातील काही अडचणीचा अभ्यास केल्यास काही मूल्य कशापध्दतीने लोप पावत आहेत हे लक्षात येईल.

**अ. शहरी भागातील आव्हाने —**

१. विविध प्रसार माध्यमांचा वाढता प्रभाव हा विद्यार्थी वर्गाला मूल्य शिक्षणाबाबत उदासिन बनवितो.

२. वर्गातील विद्यार्थ्यांमध्ये जातीय व धर्माबाबत संकल्पना जाणीवा विकसित व्हायला सुरूवात झालेली असते.

३. विद्यार्थ्यांचे आईवडील दोघेही नोकरदार असल्याने ते मूल्यांबाबत जागृत नसतात.

४. परंपरागत मूल्यव्यवस्थेबाबत पालकांचे कमालीचे औदासिन्य असते.

५. स्थानिक नेते हे मूल्य शिक्षणाला विशेष प्रोत्साहन देण्यासाठी उत्सुक नसतात.

**ब. ग्रामीण भागातील आव्हाने**

१. परंपरा चालीरिती

२. पालकांचे अज्ञान

*Copyright © 2020, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

३. शैक्षणिक साहित्याचा अभाव

४. पालकांची अंधश्रध्दा

५. प्रशिक्षित शिक्षकांचा अभाव

**सृजनशील उपक्रमातून विद्यार्थ्यांमधील मूल्याचा विकास —**

महाराष्ट्र शासनाने आपल्या शैक्षणिक धोरणात सध्याच्या काळास आवश्यक अशा १० नैतिक मूल्यांचा समावेश केला आहे. मूल्य शिक्षणासाठी पूर्वी ३०मिनिटे दिली जात होते परंतू त्यामध्ये बदल करून आता ५मिनिटे फक्त मूल्यशिक्षणावर दिला जातो. ह्या अपूऱ्या वेळेत मूल्यांचा विकास कसा करायचा? यासाठी शिक्षकांमध्ये जर सृजनशील उपक्रम निर्माण करण्याची क्षमता विकसित केली तर मूल्यांमध्ये आपोआपच मूल्याचा विकास होईल. प्रत्येक मूल्यानूरूप उपक्रम पुढीलप्रमाणे—

**मूल्ये**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | राष्ट्रभक्ती | ६. | वैज्ञानिक दृष्टिकोन |
| २. | राष्ट्रीय एकात्मकता | ७. | सौजन्यशीलता |
| ३. | सर्वधर्म समभाव | ८. | संवेदनशीलता |
| ४. | स्त्रीपुरूष समानता | ९. | वक्तशीरपणा |
| ५. | श्रमप्रतिष्ठा | १०. | नीटनेटकेपणा |

वरील दहा मूल्यांपैकी श्रमप्रतिष्ठा या मूल्याचा विकास झाल्यास त्यातील अनेक मूल्यांचा विकास आपोआपच होतो. त्यामूळे श्रमप्रतिष्ठा मूल्याचा विकास करण्याचे संशोधिकीने ठरविले.

**श्रमप्रतिष्ठा**

जीवनाचे नंदनवन करण्याचा मार्ग एकच आणि तो म्हणजे परिश्रम करणे होय. असे गटे यांनी म्हटले आहे. श्रम हे आपले ध्येय प्राप्त करण्याच्या मार्गावरील महत्त्वाचा टप्पा आहे. म्हणून लहानपणीच श्रम करण्याची सवय लागावी म्हणून महाराष्ट्र शासनाने मूल्य शिक्षण हा विषय अनिवार्य करून शाळांमधून शैक्षणिक वर्ष १९९७—९८ पासून अमंलबजावणीस आणला होता.

**श्रमप्रतिष्ठेची गरज**

श्रम हा विकासाचा पाया आहे. या मूल्याची पायाभरणी अगदी लहाणपणापासूनच होणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांमध्ये जर श्रमप्रतिष्ठेची जाणीव निर्माण करावयाची असेल तर ती अगोदर शिक्षकामध्ये असणे आवश्यक आहे. येणाऱ्या भावीपिढीला वैयक्तिक व सार्वजनिक श्रमप्रतिष्ठेची सवय लावण्यासाठी सृजनशील शिक्षक निर्माण व्हावा लागतो. तसेच माहिती तंत्रज्ञान युगामध्ये वाढत चाललेला आळशीपणा कमी करण्यासाठी सुध्दा श्रमप्रतिष्ठा मूल्याची गरज आहे.

*Copyright © 2020, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

**श्रमप्रतिष्ठेचे महत्त्व**

स्वत:चे भाग्य स्वत: घडविणारा जीवनसृष्टीतील एकमेव प्राणी म्हणजे माणूस आणि त्याचे हे वेगळेपण मूल्यांवर अवलंबून आहे. मूल्यांवर मानवाचे भवितव्य घडत असते. परंतू या मूल्याचे संस्कार जर शिक्षक प्रशिक्षणार्थींना दिले तर त्यांच्या हातून येणारी पिढी आपोआपच मूल्य संस्कारीत होईल. यासाठी संशोधिकीने बी.एड. प्रशिक्षणार्थींना श्रमप्रतिष्ठा या मूल्याचा विकास कसा करता येईल. या विषयीचा अभ्यास करण्याचे ठरविले.

**समस्या**

''सृजनशील उपक्रमातून विद्यार्थ्यांमधील श्रमप्रतिष्ठा मूल्याचा विकास''

**कार्यात्मक व्याख्या**

**सृजनशीलता**

नावीन्यतेने विचार करणे म्हणजे सृजनशीलता होय.

**उपक्रम**

खरे अनुभव व ज्ञान कृतीमधून प्राप्त होते. कृती अनुभूतींना मूर्त स्वरूपात प्रकट करते. कृतीतून शिक्षण कृती कार्यक्रम ही पध्दतीशीर चालणारी प्रक्रिया आहे. ज्यामध्ये वेगवेळ्या उपक्रमाची पध्दतशीर मांडणी केलेली असते.

**श्रमप्रतिष्ठा विकास**

कोणतेही शारिरिक व कष्ठाचे काम हे कमी दर्जाचे न लेखता ते स्वेच्छेने, उत्साहाने करण्याची तयारी दाखविले म्हणजे श्रमप्रतिष्ठा होय. कोणतेही काम न लाजता करण्याची तयारी त्यामध्ये संपूर्ण सहभाग व इतर काम करणाऱ्या व्यक्तीविषयी असणारा आदरभाव म्हणजे श्रमप्रतिष्ठा विकास होय.

**उद्‌दिष्टे**

१. बी.एड. प्रशिक्षणार्थींच्या वैयक्तिक व सार्वजनिक मूल्यांचा शोध .

२. बी.एड. प्रशिक्षणार्थींच्या श्रमप्रतिष्ठा रूजविण्यासाठी उपक्रमांची निर्मिती.

३. बी.एड. प्रशिक्षणार्थींच्या श्रमप्रतिष्ठा मूल्य रूजविण्यासाठी राबविलेल्या उपक्रमांची परिणामकारकता तपासणे.

**गृहितक**

१. बी.एड. प्रशिक्षणार्थी १८ वर्षांनंतरचे असल्यामुळे त्यांना मूल्याविषयी माहिती आहे.

*Copyright © 2020, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

**संबंधित साहित्याचा आढावा**

नागतोडे किरण (सप्टेंबर २००६), 'नैतिक मूल्य शिक्षण', तुरंकुंडे भाऊसाहेब बबन,(२००७—०८), 'नीटनेटकेपणा मूल्याची जाणीव', बोत्रे शितल, (२००८—०९), 'वक्तशीरपणा मूल्यासंदर्भातील समस्यांचा अभ्यास'

**संशोधन परिकल्पना**

ग्रामस्वच्छता पाणी फांऊडेश, राष्ट्रीय वेगवेगळ्या मंडळातील सहभाग, अशासकीस संघटना, ग्रामीण व शहरी भागातील उत्सव मंडळे, वृक्षारोपण हे उपक्रम राबविल्यानंतर बी.एड. प्रशिक्षणार्थींमध्ये श्रमप्रतिष्ठा मूल्याबद्दल जाणीव होईल.

**प्रस्तुत संशोधनासाठीची पध्दत (Method of Research)**

प्रस्तुत संशोधनात प्रायोगिक पध्दतीचा अवलंब केला आहे.

**माहिती विश्लेषण पध्दत (Method of Information Analysis)**

चाचणीद्वारे मिळालेल्या माहितीचे विश्लेषण खालील संख्याशास्त्रीय साधनांचा उपयोग करून केले आहे.

१. मध्यमान २. प्रमाण विचलन ३. **t** परिक्षिका

यांचा उपयोग करून माहितीचे विश्लेषण केले आहे.

**जनसंख्या(Population)**

प्रस्तुत संशोधनाच्या अभ्यासाची जनसंख्या ही पुणे जिल्ह्यातील ग्रामीण व शहरी भागातील बी.एड. प्रशिक्षणार्थींची संख्या होय.

**नमुनानिवड (Sample)**

प्रस्तुत संशोधनासाठी प्रासंगिक नमुना निवड पध्दतीने म्हणजेच जे प्रतिसादक (विद्यार्थी) सहज उपलब्ध होऊ शकतात. अशांचा समावेश यामध्ये केलेला आहे. बी.एड. प्रशिक्षणार्थी एकुण २० विद्यार्थ्यांचा समावेश नमुना निवडीत केला आहे.

**संशोधनाचे साधन (Research Tool)**

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधिकीने स्व:निर्मित प्रश्नावली या साधनाची निवड केली आहे.

*Copyright © 2020, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

**निष्कर्ष**

| अ. क्र. | तपशील | विद्यार्थी संख्या | मध्यमान | प्रमाण विचलन | प्राप्त टी गुणांक | सार्थकता स्तर | | स्वाधिनता मात्रा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | ०.०५ | ०.०१ | |
| १ | पुर्व चाचणी | २० | ५ | ७.३० | १०.४ | २.०९ | २.४६ | १९ |
| २ | उत्तर चाचणी | २० | ९ | ३.१० | | | | |

पुर्व चाचणी व उत्तर चाचणी मधील फरक ४ आहे. प्रशिक्षणार्थींच्या प्राप्तांकाच्या प्रमाण विचलनातील फरक ४.२ आहे. टी मूल्य १०.४ आहे. सार्थकता स्तर ०.०१ आहे. व स्वाधीनता मात्राची २.४६ आहे तसेच सार्थकता स्तर ०.०५वर स्वाधीनता मात्रा १९ची २.०९ आहे. टी मूल्य १०.४ हे २.४६ व २.०९पेक्षा जास्त आहे.

**समारोप**

मूल्यवर्धन उपक्रम राज्यघटनेतील स्वातंत्र्य, न्याय, समता व बंधुता या चार मुख्य मूल्यांवर आधारित आहे. त्याला राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखड्यातील मानवी श्रमप्रतिष्ठेविषयी आदर स्वायत्तता, जबाबदारी, चिकित्सक व सृजनशील उपक्रम या मूल्यांची जोड लागते. अभ्यासक्रमातून ही मूल्ये आपोआप रूजत जातात.

**संदर्भ**

*डॉ. अरविंद दुनाखे 'पर्यायी शिक्षणपध्दती' नित्यनुतन प्रकाशन, पुणे,२००६.*

*उपासनी, ना.के, 'नवे शैक्षणिक मूल्यमापन आणि संख्याशास्त्र', श्री विद्या प्रकाशन, पुणे १९८७.*

*डॉ.कुंडले,म.बा. 'सर्जनशीलता' नुतन प्रकाशन, पुणे २००८.*

*डॉ. गौतम लोंढे, डॉ. दत्तात्रय तापकीर, डॉ.निर्मला तापकीर, अध्ययन अध्यापन प्रक्रिया.*

*डॉ. एकनाथ गावंडे, प्रा. अमित गावंडे 'मूल्याधिष्ठित शिक्षण' नित्यनुतन प्रकाशन, पुणे,२००८.*

*डॉ. वसूधा देव 'मूल्यशिक्षण' पार्थ प्रकाशन, २०१४.*

*डॉ. म.बा. कुंडले 'शिक्षण समीक्षा' ऑगस्ट २०१६.*

*जीवन शिक्षण, एप्रिल २०१८.*

*जीवन शिक्षण, मे २०१९.*

*Copyright © 2020, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*